① प्रति

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७५ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/खरेदी-खरेदी/3081/२०२१
दिनांक- 13 DEC 2021

प्रति,
मे.-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------

विषयः- फिल्टर कॉफी (जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२२) या कालावधीकरीता... दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे फिल्टर कॉफीची खरेदी दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून परिशिष्ट आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रासह सादर करावे.

**अटी/शर्ती –**

१. दरपत्रकासोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.

२. दरपत्रकासोबत स्वतंत्रपणे आपण पुरविणार असलेले ब्रॅन्डेड कॉफीचे किमान २०० ग्रॅम वजनाचे पॅकेटचा नमुना दयावा.

३. दरपत्रकासोबत ज्या ब्रॅण्डचा कॉफीचा नमुना दिला आहे. त्या ब्रॅण्डचे कॉफीचा पुरवठा करावा लागेल.

४. कॉफीचे नमुने नसलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

५. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर **सर्व कर, GST, GST-TDS, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई तसेच शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.**

६. कॉफीचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईबाबा मंदिराजवळील भांडार विभागामध्ये करावा लागेल.

७. आपले दरपत्रक मंजूर झालेस कॉफीचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम कॉफीचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर व पुरवठा कालावधी संपलेनंतर परत केली जाईल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

८. दरपत्रक मंजूर झालेवर रू.१००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर त्वरीत करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी आपणास आदा करावी लागेल.

९. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा फिल्टर कॉफीची मागणी संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील.

१०. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद कॉफीचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येईल. त्यामध्ये नमूद परिमाण इतकाच कॉफीचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेले परिमाण (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे दरपत्रकात किंवा पुरवठा आदेशात नमूद कॉफीचे परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

११. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच फिल्टर कॉफीचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

१२. पुरवठा करीत असलेल्या फिल्टर कॉफीची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन स्विकारली जाते. तथापी ती स्विकारलेनंतरही एखादा बॉक्स, लॉट अगर काही कॉफी खराब आढळल्यास ती स्वखर्चाने बदलून द्यावी लागेल.

१३. फिल्टर कॉफी पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार पाऊच/बॉक्सवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

१४. कॉफी पुरवितांना ती किती परिमाणाचे (पाऊच/बॉक्स/पिशवी पॅकिंग) पॅकिंगमध्ये पुरविले जाईल हे नमुन्यासोबत लेखी पत्राव्दारे कळवावे.

१५. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या कॉफीचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर कॉफी बदलून द्यावी लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन कॉफी विकत घ्यावी लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या कॉफीच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

१६. आपण पुरविलेल्या कॉफीचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस आपणावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत आपली कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१७. आपण पुरविलेली कॉफी संस्थानने नाकारली व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुनही वसुल केली जाईल.

१८. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

१९. पुरवठा आदेशातील कॉफी मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या कॉफीची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या कॉफीची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२०. कॉफी पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीची नसल्यामुळे ती नाकारली गेल्यास संस्थानची अडचण हौऊ नये म्हणून संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितकी किंवा दिलेल्या आदेशा इतकी कॉफी दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या कॉफीसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२१. दरपत्रकातील मंजूर दराने कॉफी पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने कॉफी पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

२

२२. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी दरपत्रकधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक कॉफीचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२३. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून ९० दिवसांचा राहील.

२४. पुरविलेले कॉफीची गरजेनुसार लॅबमध्ये तपासणी करण्यात येईल व पुरविलेली कॉफी जर FSSAI Norms प्रमाणे नसलेस ती बदलून दयावी लागेल.

२५. फिल्टर कॉफीचा पुरवठा कालावधी जानेवारी २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत राहील याचा दर भरतांना दरपत्रकधारकाने विचार करावा.

२६. शिर्डी संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

२७. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहाणार नाही.

२८. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"फिल्टर कॉफी खरेदी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२९. फिल्टर कॉफी पुरविलेनंतर साधारण ३० दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी संस्थानकडून आगाऊ रक्कम (अ‍ॅडव्हान्स) दिली जाणार नाही.

३०. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

३१. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३२. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक २५ / १२/२०२१.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

My document/ quotation form

# फिल्टर कॉफी खरेदी दरपत्रक परिशिष्ट

| अ.नं | मालाचा तपशिल | अंदाजे मागणी | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फिल्टर कॉफी-FSSAI | १२०० किलो | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का